DTEPA – A – 109

ISO 9001 : 2015
ISO 14001 : 2015
ISO 27001 : 2013
ISO 45001 : 2018

# जवाहरलाल नेहरु पत्तन प्राधिकरण
# JAWAHARLAL NEHRU PORT AUTHORITY

जनेप प्राधिकरण
JNPA

पत्तन कार्यालय : प्रशासन भवन, शेवा, नवी मुंबई – 400707. Port Office : Administration Bldg., Sheva, Navi Mumbai - 400 707.
मुख्य सतर्कता अधिकारी Chief Vigilance Officer - (022) 2724 4151 ; मुख्य प्रबंधक (प्रशासन) एवं सचिव Chief Manager (Admn.) & Secy - (022) 2724 4021 ;
मुख्य प्रबंधक (यातायात) Chief Manager (Traffic) - (022) 2724 4191; मुख्य प्रबंधक (यां.एव.वि.अ.) Chief Manager (M&EE) - (022) 2724 4181 ;
मुख्य प्रबंधक (वित्त) Chief Manager (Fin) - (022) 2724 4081; मुख्य प्रबंधक (प.यो.वि.) Chief Manager (PP&D) - (022) 2724 4156
उप-संरक्षक Dy. Conservator (022) 2724 4171; हार्बर मास्टर (022) 2724 4173.
Website : www.jnport.gov.in • E-mail : info@jnport.gov.in

जनेपप्रा/पयोवि/वाढवण/2023/ 132 दि: 01/02/2023

प्रति,

मानद सचिव,

सोसायटी फॉर फास्ट जस्टिस डहाणू रोड,

11, जनार्दन आर्केड, पहिला मजला, स्टेशन रोड (प.)

डहाणू रोड, जिल्हा पालघर 401602

विषय: वाढवण येथे प्रस्तावित बंदर

संदर्भ: सोसायटी फॉर फास्ट जस्टिस डहाणू रोडचे जिल्हाधिकारी पालघर यांना पत्र दिनांक १३/१२/२०२२ आणि १०/०१/२०२३.

महोदय,

आपणास माहिती आहे की, जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने ("जनेप प्राधिकरण") बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या व महाराष्ट्र सागरी मंडळ (महाराष्ट्र शासन) यांच्या अधिपत्याखाली वाढवण, जिल्हा पालघर, महाराष्ट्र ("प्रस्तावित प्रकल्प") येथे 'ग्रीनफिल्ड पोर्ट' विकसित करण्याचा प्रस्ताव दिला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने दि. 5 फेब्रुवारी 2020 रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यात डहाणू-वाढवण येथे प्रस्तावित बंदर उभारण्यास तत्वतः मान्यता दिली आहे. या प्रकल्पामध्ये जेएनपीए व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, महाराष्ट्र सरकारची अनुक्रमे 74 टक्के आणि 26 टक्के भागीदारी आहे. जहाज वाहतूक मंत्रालयाने 19 फेब्रुवारी 2020 रोजी भारतीय बंदर अधिनियमांतर्गत वाढवण बंदराची प्रमुख बंदर (मेजर पोर्ट) म्हणून अधिसूचना प्रकाशित केली आहे. सदर प्रकल्पसाठी अंदाजीत 3600 एकर जागेवर भराव करण्याची आवश्यकता असणार आहे.

डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण ("डीटीईपीए") ने दिलेल्या आदेशांचे पालन करताना आवश्यक ते सर्व अहवाल डहाणू व पालघर तालुक्यातील 41 गावे तसेच मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी याना देण्यात आले आहे. हे सर्व अहवाल वाढवण बंदराच्या https://vadhvanport.in/ या संकेतस्थळावर आपल्या सुलभ माहितीसाठी उपलब्ध आहेत.

केंद्रीय सागरी मत्स्यपालन संस्था (CMFRI) मार्फत तटीय मत्स्यव्यवसायावर प्रस्तावित वाढवण बंदराच्या प्रभावाचा अभ्यास करण्यात आला आहे आणि मसुदा अहवाल जो प्रभावित गावांना आणि मच्छीमार सोसायट्यांना वितरित करण्यात आला आहे. ज्या मच्छीमारांची उपजीविका कमी होत आहे त्यांची ओळख अहवालात करण्यात आली आहे आणि त्यांना महाराष्ट्र सरकारच्या

वाढवण बंदराच्या विकासामुळे वाढवणच्या आसपासच्या किनारी गावांच्या मुद्द्यावर केंद्रीय जल आणि ऊर्जा संशोधन केंद्र (CWPRS) द्वारे केलेल्या विशिष्ट अभ्यासामुळे किनारपट्टीच्या गावांना पुराचा धोका नाही हे निर्णायकपणे सिद्ध झाले आहे. त्यामुळे आपण व्यक्त केलेली ही शंका CWPRS द्वारे सत्यापित केलेल्या तथ्यांवर आधारित नाही.

प्रस्तावित प्रकल्पाचा या क्षेत्राच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीवर सकारात्मक परिणाम होईल. स्थानिक लोकांसाठी रोजगाराच्या अधिक संधी निर्माण झाल्यामुळे आणि उत्पन्न वाढवण्याचे मार्ग यामुळे या प्रदेशातील सामाजिक पायाभूत सुविधा बदलण्याची शक्यता आहे.

धन्यवाद,

आपला विश्वासू,

विश्वनाथ घरत
प्रबंधक (पयोवि)

प्रत माहितीसाठी,

1. मा. जिल्हाधिकारी पालघर, दुसरा मजला, पार्श्वनाथ ९, बिडको नाका, जिल्हा: पालघर
2. विशेष कार्य अधिकारी, डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण, मुंबई
3. सोसायटी फॉर फास्ट जस्टिस डहाणू रोड: दि 20/01/2023 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने.

DCA(o)-071
30.1.23

A-109

मामेकं शरणं व्रज

# SOCIETY FOR FAST JUSTICE
# DAHANU ROAD


Reg. No महा/२१७४/२०१२/ठाणे
11, janardan Arcade, 1st Floor, Station Road, Dahanu Road (W),
Dist : Palghar. 401602, Telefax 02528-225400
Email : societyforfastjustice@rediffmail.com

Narendra R. Patel President Mob No. 07798451836
Vitthal Padwale Vice-president Mob No. 09970806649
Prakash Abhyankar Hon-.secy Mob No. 09850234706


संख्या CHO-092
दिनांक 25.01.23.

आवक क्र. 321
दि. : 30/1/23

जावक क्र. -S.F.F.J/JNPT-NM/1-2023

DATE :20-01-2023

To,
Chairman, JNPT
Jawaharlal Neharu Port Trust
Prashasan Bhavan, Sheva, New Mumbai 400707

SHVGY
30/1

Chairman/Dy. chairman
CM(1/0)

Subject:- Proposed Vadhavana Port
Reference:- 1) Applicant's letter to Chief Officer, DAHANU Nagar Parishad, 22/9/2022. 2) From Collector office to JNPT , SHEVA, New Mumbai, date 30/11/2022. 3) Applicant's letter, date 13/12/2022,to dist. Collector office. 4) Letter from Town Planning, date 16/12/2022, to JNPT, SHEVA. 5) Letter from Town Planning, date 30/12/2022, to Applicant. 6) Applicant's letter to Collector office, date 10/01/2023. 7) Letter from Tehsildar, date 17/01/2023, to Applicant.

Respected Sir,

We, the Applicants are residents of DAHANU town.

Our DAHANU area is adjacent to and is within 10 km from the proposed port site.

The DAHANU Creek, the south boundary of DAHANU town, is at the north-east vertex of the quadrilateral shaped port area.

DAHANU town and(Municipal limit) and some villages at the sea shore till Bordi, is having very specific topography w.r.t. Arabian. sea, creeks, mudflats etc. And we feel that it is not well understood fact while planning the said Mega Port.

We feel that we should not just rely on some contradictory, exaggerated information news about the proposed port project. Port plans, maps, and other related reports we tried to get from various authorities but we could not.

Hence we request that your authentic said reference material be made available at our place, with the authorities referred.

This application is in the interest and welfare of the ESA , DAHANU town and taluka.

pl discuss
Shri Madhbhushi

अधिकारी Rajn/Sagar

Thanking you,

सोसायटी फॉर फास्ट जस्टिस,
डहाणू रोड

P.R.Abhyankar
HON.SECY.

Document Attached: 7 Documents as mentioned in reference.

मामेकं शरणं व्रज
# SOCIETY FOR FAST JUSTICE
## DAHANU ROAD
Reg. No महा/२५७४/२०१२/ठाणे
dan Arcade, 1st Floor, Station Road, Dahanu Road (W),
Dist : Palghar. 401602, Telefax 02528-225400
Email : societyforfastjustice@rediffmail.com

Narendra R. Patel President
Mob No. 07798451836

Vitthal Padwale Vice-president
Mob No. 09970806649

Prakash Abhyankar Hon.-secy
Mob No. 09850234706

जावक क्रमांक- S.F.F.J /COLT-PAL/0-5-2022

DATE : 13/12/2022

प्रती,

मा. जिल्हाधिकारी जिल्हा मुख्यालय,
पालघर - बोईसर रोड,
कोळगाव - पालघर 401 404.

विषय:- प्रस्तावित वाढवण बंदरामुळे, आपल्या अधिकार क्षेत्रातील, डहाणू तालूक्यातील किनारपट्टी, खाड्या खारभूमी ई. वरील जलस्तर वाढीने लगतच्या गाव - पाडे, डहाणू शहर येथिल लोकवस्त्यावर संभवीत होणाऱ्या परिणामाबद्दल विविध संस्थांनी प्रसिद्ध केलेले अहवाल मागवून घेऊन उपाय-योजना आखणी करण्याबाबत.

संदर्भ:- आमचे दि. 27-09-2022 रोजीचे पत्र.

मा. महोदय / महोदया,

आपणास ज्ञात आहेच कि डहाणू तालूक्यांतील वाढवणच्या समुद्र किनाऱ्यापासून 6.50 कि.मी. समुद्राच्या आत, आशिया खंडातील सर्वात मोठे अंदाजे 5000 एकरचे बेट तयार करून बंदर उभारणी प्रस्तावित आहे. तसेच सुमारे 12 कि.मी. लांबीची ब्रेक वॉटर वॉल बांधली जाणार आहे.

सदर संभवीत बंदर उभारणीमुळे तालूक्याची समुद्र किनारपट्टी, खाड्या, खारभूमी, नदी, ओहोळ, नाले, गटारे, यावर कसा, किती, व कधी जलस्तर वाढून, तात्पूरता व कायमस्वरूपी परिणाम होऊ शकतो, यासाठी केंद्र शासनाने व ईतर संस्थांनी नेमलेल्या तज्ञांकडून यापूर्वी पाहाणी करून अहवालातील नकाशांत व बंदरापासून 10 कि.मी. त्रिज्येमधील भूभागांवर होणाऱ्या संभवीत जलस्तर वाढीच्या प्रभावाचा उहापोह, खूणाकरून, दिला आहे.

या सर्व पाहाण्यांचे मराठी व इंग्रजीतील अहवाल, डहाणू खाडीच्या दक्षिणेकडील तालूक्यांतील बहूतेक ग्रामपंचायतींना DTEPA च्या आदेशाने देण्यांत आले आहेत.

परंतू डहाणू खाडीच्या उत्तरेकडील किनारपट्टी, खाजणभाग, खार जमीनी असलेल्या ग्रामपंचायती व डहाणू नगर परिषद यांना तसेच आपल्यासह या भागातील महत्त्वाच्या, राज्य व केंद्र शासनांच्या कार्यालयांना, हॉस्पिटल्स, शाळा - कॉलेज यांना सदर अहवाल देण्यांत आले नसल्याचे समजते.

या संभवित मानव निर्मित संकटाची कल्पना नसल्याने उद्‌भवू शकणाऱ्या आपतकालीन उपाय - योजनांची आखणी करण्यावर विचारही केला गेला नसावा.

या बाबतची जाणीव व्हावी, डहाणू तालूका कल्याणार्थ सोसायटीने वरील संदर्भीय पत्र आपणास दिले होते. सदर पत्रासमवेत डहाणू तालूक्यांतील भागांवर होऊ शकणारा परिणाम दर्शवणाऱ्या नकाशाचीही प्रत जोडली होती. आमच्या माहितीप्रमाणे खाडीच्या दक्षिणेकडील ग्रामपंचायतींना खालील प्रमाणे अहवाल JNPT कडून देण्यात आले आहेत. 1. FINAL COMPILED DPR – 29.12.2021. 2. R8 – DRAFT_ EIA_ 18.07.2022 3. FINAL SIA REPORT_

OPT. 4. DRAFT FISHERIES REPORT – JNPT VADHAVAN. 5. NCSCM – CHENNAI – REORT. 6. भारत राजपत्र - PORT NOTIFICATION] VADHVAN.

भूगार्भातील आटलेल्या गोड्या पाण्याच्या झऱ्यांमुळे, खारे पाणी आत शिरुन शेती बागायतीला लागणारे गोडे पाणी मचूळ झाले असून संभवित सागरी जलस्तर वाढीने शेती व संभवित बंदरामुळे समुद्री जीवांच्या नामशेष होण्याच्या शक्यतेने अन्न सुरक्षेला मोठी बाधा होण्याची शक्यता वाटू शकते.

जेणे करून या सर्व भागांतील नागरीकांना शासनाकडून उद्‌भवू शकणाऱ्या धोक्या आधीच जान-मालाचा बचाव करणे सोपे जाईल.

तसेच प्रस्तावित तसेच नुकताच मंजूर झालेला, राष्ट्रीय सागरी महामार्ग, डहाणू तालूक्यातून बहूतांशी खाजण भागातून जाणार आहे. त्यामुळे ही खाजणपटटयात भरणी होऊन, पूर्वीपासून तेथे येणारे भरती व पावसाचे पाणी, लगतच्या भागांत शिरकाव करणार आहे. असा दुहेरी फटका डहाणू तालूक्यातील, डहाणू खाडीच्या उत्तरे पूर्व भागाला बसणार आहे.

तरी आपणास नम्र विनंती कि आपण सदर JNPT ने पुरवलेले अहवाल मागवून घेऊन आपल्या तज्ञांकडून आवश्यकते प्रमाणे पून्हा पाहाणी करावी. या अहवालांनुसार व आपणही आपल्या तज्ञांकडून होऊ शकणाऱ्या पाहाणी अहवालांनुसार संभवित, किनारपट्टया, खाड्या व खारभूमीवर वाढू शकणाऱ्या जल स्तराने, संभवित संकटे / धोक्यांवर आधीच आपतकालीन उपाय - योजना आखाव्यात.

आपला विश्वासू,

मानद सचिव.

**सोसायटी फॉर फास्ट जस्टिस,**
**डहाणू रोड**

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर

(भुसंपादन शाखा - रुम नं.१०७)

जिल्हा मुख्यालय, पालघर-बोईसर रोड, कोळगांव, ता.जि.पालघर पिन कोड - ४०१ ४०४

फोन नं. ०२५२५-२५३१११

Email - bhusampadanpalghar@gmail.com

---

क्र.भूसंपादन/कक्ष-१/टे-१/कावि-१११६/२०२२ दिनांक :- ३०/११/२०२२

**प्रति,**
**मुख्य प्रबंधक,**
**प्रकल्प परियोजना विकास (PP&D)**
**जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (JNPT)**
**प्रशासन भवन, शेवा , नवी मुंबई ४००७०७**

**विषय**:- प्रस्तावित वाढवण बंदरावर NCSCM च्या अहवालातील डहाणू शहरातील काही भाग समुद्राच्या वाढवणाऱ्या पाण्याचा परिणाम होत असल्याबद्दल आपल्या तात्काळ मताचे प्रकटन करणेबाबत.

**संदर्भ**:- १)मा.सहा.जिल्हाधिकारी डहाणू विभाग डहाणू यांचेकडील पत्र क्र.डीपी/जमिनबाब/कावि-८५५ दि.२२/११/२०२२ रोजीचे पत्र.
२) मानद सचिव, सोसायटी फॉर जस्टिस, डहाणू रोड यांचे दि.२७/०९/२०२२ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, मानद सचिव, सोसायटी फॉर जस्टिस, डहाणू रोड ता.डहाणू जि.पालघर यांचा दि.२७/०९/२०२२ रोजीचा अर्ज संदर्भ पत्र क्र.१ अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदरचा अर्ज पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठवित आहोत.

तरी सदर प्रकरणी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करुन, संबंधितांना आपले स्तरावरुन परस्पर कळविणेंत यावे.

**सोबत**- वरील प्रमाणे

प्रत प्राप्त
[signature]
28-12-2022

(बाळासाहेब कोळेकर)
**उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) समन्वय**
**जिल्हाधिकारी पालघर करिता**

**प्रत** :- मा.सहा.जिल्हाधिकारी, डहाणू विभाग, डहाणू यांना माहितीसाठी.
**प्रत**:- मानद सचिव, सोसायटी फॉर जस्टिस, डहाणू रोड- पत्ता-११ जर्नादन ऑर्केड, १ला मजला स्टेशन रोड, डहाणू रोड (पश्चिम) डहाणू- ४०१६०२ यांना माहितीसाठी.

401602

E:\Sagar Saindane bhusampadan\letter samnvay\



काप्र

**महाराष्ट्र शासन**

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

कोकण विभाग

कक्ष क्र.३०५, तिसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई-४००६१४

दुरध्वनी क्र.- ०२२-२७५७१५६९ Email Id-jdtp.konkan@maharashtra.gov.in

क्रमांक: सहसंकोवि/वाढवण बंदर/ अर्ज २१८६ दि १६/१२/२०२२

प्रति,

१) मा.व्यवस्थापक,
जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट,
प्रशासन भवन, शेवा, नवी मुंबई ४०० ७०७

२) सहायक संचालक,
नगर रचना, पालघर.

३) मुख्य अधिकारी,
डहाणू नगरपरिषद.

विषय :- डहाणू शहराच्या , ३० वर्षानंतरही पूर्ण मंजूरी वीना रखडलेल्या विकास (मागास) आराखडयावर, वाढवण बंदरामुळे शहर प्राकृतिक बदल संभव, या पार्श्वभूमीवर पुनर्पहाणीच्या आवश्यकतेमुळे तो पर्यंत तूर्तास त्वरीत वि.आ. होऊ घातलेल्या सर्व अर्थ विनाशी रस्ता रुंदीकरणास स्थगिती देणेबाबत...

संदर्भ:- सोसायटी फॉर फास्ट जस्टीस डहाणू रोड यांचे दिनांक ३.१०.२०२२ रोजीचे या कार्यालयास उद्देशून असलेले पत्र

महोदय,

विषयांकीत प्रकरणी सोसायटी फॉर फास्ट जस्टीस डहाणू रोड यांचे दिनांक ३.१०.२०२२ रोजीच्या पत्राची प्रत यासोबत जोडलेली आहे. सदर अर्जामध्ये नमूद बाबीसंदर्भात वस्तूस्थितीच्या अनुषंगाने या कार्यालयास अवगत करण्याची विनंती आहे, जेणेकरुन अर्जदार यांना या कार्यालयाकडून उत्तर देता येईल.

आपला,

(जितेंद्र ल. भोपळे)
सहसंचालक, नगररचना
कोंकणविभाग, नवी मुंबई.

काप्र

प्रत माहितीसाठी

मानद सचिव सोसायटी फॉर जस्टीस, डहाणू रोड.

Mail sent 16/12/22 at 01:44 pm

\\Nagarrachna01\I\Back up as on 5-8-2010\DSP/call letter updated

**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**कोकण विभाग**
**कक्ष क्र.३०५, तिसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई-४००६१४**
**दुरध्वनी क्र.- ०२२-२७५७१५६९** Email Id-jdtp.konkan@maharashtra.gov.in

क्रमांक- माहिती अधिकार/सहसंकोवि/२४७१ दि. ३० /१२/२०२२

**प्रति,**

**प्रकाश विष्णू अभ्यंकर,**
मानद सचिव, सोसायटी फॉर जस्टीस डहाणू,
११, जनार्दन आर्केड, पहिला मजला,
मेन रोड, डहाणू रोड, जि. पालघर ४०१ ६०२

विषय- **माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज.**

संदर्भ- आपला या कार्यालयास दिनांक १३.१२.२०२१२ रोजी प्राप्त अर्ज.

**महोदय,**

प्रस्तुत प्रकरणी, आपण डहाणू शहराच्या , ३० वर्षानंतरही पूर्ण मंजूरी वीना रखडलेल्या विकास (मागास) आराखडयावर, वाढवण बंदरामुळे शहर प्राकृतिक बदल संभव, या पार्श्वभूमीवर पुनर्पहाणीच्या आवश्यकतेमुळे तो पर्यंत तूर्तास त्वरीत वि.आ. होऊ घातलेल्या सर्व अर्थ विनाशी रस्ता रुंदीकरणास स्थगिती देणेबाबत असा विषय नमूद करुन या कार्यालयास पाठविलेल्या दिनांक ३.१०.२०२२ रोजीच्या पत्रासंदर्भात टिप्पणी व पत्रव्यवहाराच्या प्रती अपेक्षिलेल्या आहेत.

आपल्या पत्रावर या कार्यालयाने मा. व्यवस्थापक, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, सहायक संचालक, नगर रचना, पालघर व मुख्य अधिकारी, डहाणू नगरपरिषद यांचेकडून दिनांक १६.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये वस्तूस्थिती अहवाल अपेक्षिलेला आहे. सदर पत्राची प्रत यासोबत जोडलेली आहे.

वरील माहितीने आपले समाधान होत नसल्यास आपण खालील नमुद प्रथम अपिलिय अधिकारी यांचेकडे अपिल दाखल करू शकता.

**प्रथम अपिलिय अधिकारी यांचा पत्ता**
सहसंचालक, नगर रचना,
कोकण विभाग, कोंकण भवन,
कक्ष क्र.३०५, तिसरा मजला,
कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
दुरध्वनी क्र.०२२-२७५७१५६९

**आपला,**

(राजेंद्र चौहान)
**जन माहिती अधिकारी**
**तथा**
**नगर रचनाकार**
**सहसंचालक, नगर रचना,**
**कोकण विभाग, नवी मुंबई यांचे कार्यालय**

प्रत मिळाली
11.01.2023

H:\Back up as on 5-8-2010\DSP/

EM935348705IN IVR:6977935348705
SP DAHANU ROAD S.O <401602>
Counter No:1,11/01/2023,11:27
To:JLHADHIKARI ,PALGHAR
PIN:401404, Palghar H.O
From:PRAKASH V A,DAHANU RD
Wt:10gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>

मामेकं शरणं व्रज

# OCIETY FOR FAST JUSTICE
# DAHANU ROAD

Reg. No महा / २१७४ / २०१२ / ठाणे
11, janardan Arcade, 1st Floor, Station Road, Dahanu Road (W),
Dist : Palghar. 401602, Telefax 02528-225400
Email : societyforfastjustice@rediffmail.com

Narendra R. Patel President
Mob No. 07798451836

Vitthal Padwale Vice-president
Mob No. 09970806649

Prakash Abhyankar Hon.-secy
Mob No. 09850234706

जावक क्रमांक- **S.F.F.J CLTR/PAL-2**-2023

DATE :10-01-2023

प्रती,

मा. जिल्हाधिकारी साहेब,

**जिल्हाधिकारी कार्यालय पालघर.**

विषय :- प्रस्तावित वाढवण बंदराची उभारणी करणाऱ्या जे.एन.पीटी च्या विश्वासार्हतेची लिखीत **हमी देऊन, भविष्यात होणाऱ्या संभवित विस्थापनीत गावे - पाडे, शहरे यांच्या पुन** र्स्थापनेचा पूर्ण जागेचा सुस्पष्ट आराखडा, त्या त्या विस्थापिताच्या संभाव्य **पूनर्विकासासाठी, बंदर उभारणीच्या सुरवाती पूर्वी जाहिर करणे बाबत.**

मा. महाशय,

**1) सन 2022 च्या हिवाळी अधिवेशात महाराष्ट्र सरकारने, संभाव्य सन 2033 पर्यन्त टप्प्या टप्प्याने पूर्ण** होणाऱ्या वाढवण बंदराची उभारणी होणार असल्याची करण्यांत आली आहे.

**उरण येथिल जे.एन.पीटी बंदरातील बाधीत गाव - पाड्यांनी, आपल्या मुळ गावठणांतून त्यांना उठवून,** देण्यांत येणार असलेल्या जमीनींवरचा ताबा आज 35-40 वर्षानंतरही प्रत्यक्षात शासन मंजूऱ्या मिळूनही, देण्यांत **आलेला नाही. त्यासाठी आजही त्यांना, त्यांची कांहीच चूक नसताना स्व खर्चाने अनेक न्यायालयांचे उंबरठे झीजवावे लागत आहेत.**

कोणाच्या तरी आडमुठेपणामुळे, त्यांना सोसावा लागणारा मानसिक, आर्थिक त्रास/हानी, यामुळे शासनाची **विश्वसार्हता लयाला गेली आहे. त्यांना मंजूर न्यायी मागणीसाठी, न्यायालयांची दारे ठोठावायला लागणे, हि** निश्चितच राज्याला भूषणावह बाब नाही.

**अशा, विश्वासार्हता गमावलेल्या जे.एन.पीटीला, संभाव्य वाढवण बंदराची उभारणी करण्यास देणे, म्हणजे** सरळ सरळ या संपूर्ण भागातील जनतेला भावी अगणीत हाल - अपेष्टांमध्ये, जबरदस्तीने शासनच लोटणार **असल्याचे चित्र उभे राहाणार आहे.**

**या संभाव्य बंदराच्या उभारणीबाबत, ज्या अनेक संस्थांनी पाहाण्या करुन 6 अहवाल दिले आहेत. त्यांची** कल्पनाच, जिल्हा, विभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांना अभ्यासासाठी देण्यांत आलेल्या नाही, तर बंदरामुळे प्रभावित **होणाऱ्या नागरीकांना कशी असू शकणार आहे? कारण अशा प्रभावित/बाधीत होणाऱ्या भागांमध्येही जुन्या विकास** आराखड्यांप्रमाणे विकास कामांना सुरवात केली जात आहे. प्रशासकिय मंजूऱ्यां नी निधी खर्च केला जात आहे.

**2) या संभवित बंदरामुळे आपल्या जिल्ह्याचा मोठा भूभाग समुद्री जलस्तर वाढीने नष्ट होऊन मोठी जनसंख्या विस्थापित होणार आहे. शिवाय बंदरासाठी समुद्राच्या आत 5000** [redacted]. **एकराच्या माती दगड भरावामुळे,**

अनेक डोंगर सपाट केले जाऊन पर्यावरणाचा, नद्यांच्या उगमाचा नाश होऊन, पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण होणार आहे. या सर्वाचा विचार केल्यास पालघर जिल्हयातील [redacted] लोकांना विस्थापित, निर्वासीत केले जाऊन त्या सर्वांची मोठी सोय करण्यावर प्रथम विचार करावा लागणार आहे.

3) नैसर्गिक विविध मत्स्य बीज/प्रजनन स्थाने नष्ट होऊन, येथिल मत्स्य शेती, मत्स्य वैविध्यता सागरी जीवन समतोल बिघडून मत्स्य व्यवसायच नष्ट प्रद केला जाणार आहेच, त्यामुळे येथिल मच्छिमार, त्यावरच उपजीवीका असणारे, व्यावसाईकांना आधीच असलेल्या बेरोजगारीत वाढ होऊन, त्यांना असलेला जगण्याचा अधिकारच काढून घेतला जाणार आहे.

4) अशा सागरी खाद्य विविधतांच्या नष्ट होण्याने, आधीच कमी झालेल्या शेती क्षेत्रावरच मोठा ताण पडणार असून, होऊ शकणाऱ्या पाण्याच्याच कमतरतेने शेतीवरील संकट गडद होऊन, येणारे सिमीत शेत-माल उत्पादनाचे भाव प्रचंड वाढून नागरीकांच्या आवाक्या बाहेर जाण्याची शक्यता आहे.

5) त्यासाठी आता पासूनच प्रथम विचार घेण्यासाठी लोकप्रतिनिधी यातील तज्ञ, शास्त्रज्ञ, बाधीत, शासन यांच्या एका समितीची सर्व मान्य स्थापना होणे अति गरजेचे आहे.

तरी यासर्व बाबींवर गांभिर्याने विचार करुन अल्पावधींत रूपरेषा तयार करण्यास नम्र विनंती.

- कृपया JNPT कडील 6 अहवाल तातडीने मागून घ्यावेत.
- हि फक्त डहाणू नगर परिषदेपुरतीच बाब नसून ~~1.~~ पूर्ण पालघर जिल्हयावर परिणाम करणारी आहे. नेहमी प्रमाणे न.प.शाखा ई. कडे पत्र हस्तांतरीत करू नये हि पुन्हा नम्र विनंती.

आपला विश्वासू,

मानद सचिव.

**सोसायटी फॉर फा[illegible],**
**डहाणू रोड**

मामेकं शरणं व्रज

# SOCIETY FOR FAST JUSTICE
# DAHANU ROAD

Reg. No महा / २१७४ / २०१२ / ठाणे
11, janardan Arcade, 1st Floor, Station Road, Dahanu Road (W),
Dist : Palghar. 401602, Telefax 02528-225400
Email : societyforfastjustice@rediffmail.com

Narendra R. Patel President
Mob No. 07798451836

Vitthal Padwale Vice-president
Mob No. 09970806649

Prakash Abhyankar Hon.-secy
Mob No. 09850234706

जावक क्रमांक- S.F.F.J co/dnp-4-2022

DATE :22-09-2022

प्रती,

मा. मुख्याधिकारी,
डहाणू नगर परिषद,
डहाणू रोड.

विषय :- प्रस्तावित, शहर विकास आराखड्यातील जकातनाका ते बोर्डी रोड येथिल 30 मी. रस्ता रुंदीकरणासाठी पाठविण्यांत आलेल्या नोटीसा व रुंदीकरण काम करण्याचा अंतिम निर्णय घेण्यापूर्वी NCSCM च्या वाढवण बंदराच्या प्रस्तावित उभारणीमुळे ह्या भागावर होणाऱ्या परिणामांचा विचार, केंद्र व राज्य तज्ञांची मते जाणून घेण्याच्या अति - आवश्यकते बाबत.

मा. महाशय,

उपरोक्त विषयाला अनुसरून रस्तारुंदीसाठी बाधीत ठरणाऱ्या मालमत्ता धारकांना नोटीसा पाठवून, मालकी तपासणी व त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची प्रक्रिया डनपतर्फे सुरू आहे.

या 30 मी. रस्तारुंदीकरणा बाबत अंतीम निर्णय व त्यावरील पुढिल कार्यवाही सुरु करण्यापूर्वी उपरोक्त NCSCM, चेन्नई यांनी पर्यावरण, वने आणि वातावरण बदल, मंत्रालय, भारत सरकारसाठी केलेल्या अहवालात वाढवण बंदराच्या बांधणीमुळे / होण्यामुळे या भागांतील सागरी जल पातळी बाबतचे त्यांचे मत लक्षात घ्यावे.

या बाबत आपल्या मनामध्ये कांही शंका असतील तर डनपमधील तज्ञ अधिकाऱ्यांकडून, याची प्रत्यक्ष पाहाणी करून NCSCM च्या अहवालावरील त्यांचे मत मागवावे. त्यांच्या मताविषयी, जिल्हा व राज्य पातळीवरील तज्ञांकडूनही प्रत्यक्ष पाहाणी होऊन, त्यांचे मत विचारात घेतल्यानंतर, सदर रस्त्यावर होऊ घातलेला लाखो (कदाचित कोटी) चा खर्च पाण्यात न घालता, शहरातील ज्या भागांत, बंदरामुळे जलस्थितीत कांहीच बदल घडणार नाही, अशा ठिकाणांच्या अत्यावश्यक गरजांसाठी खर्च करणे, आमच्या मते हितावह असेल.

आपणही, घाई करुन, सदर निधीचा विनियोग मोफत जाण्याच्या विरूद्ध आहात.

तरी आपणास सविनय विनंती कि, आपण, या पत्रासोबत जोडलेल्या अहवालातील निवडक पाने व नकाशा यांचा अभ्यास करावा, करण्यास सांगावा, मते मागवावीत.

म्हणूनच, विकास (मागास) आराखड्यातील डनपचा प्रस्तावित रस्ता हा शाश्वत विकास रस्ता होऊ शकतच नाही. यावर सर्व दृष्टीने सारासार विचार व्हावा. त्यानुसार निर्णय व्हावा.

आपला विश्वासू,

मानद सचिव.
सोसायटी फॉर फास्ट जस्टिस,
डहाणू रोड

कार्यालय
डहाणू नगरपरिषद
दि. 22/9/2022

# तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, डहाणू यांचेकार्यालय

## (महसुल शाखा)

डहाणू फोर्ट, डहाणू गाव, डहाणू जि.पालघर पिन कोड : ४०१६०१
दूरध्वनी क्र : ०२५२८-२२११८२ ई-मेल : tahdahanu@gmail.com

क्र./महसूल/जमिनबाब/कावि-१४/२०२२ दिनांक:-१७/०१/२०२३

प्रति,

श्री. प्रकाश विष्णु अभ्यंकर
सचिव, सोसायटी फॉर फास्ट जस्टिस, डहाणू रोड,

**विषय:-** प्रस्तावित बाढवण बंदरामुळे, आपल्या अधिकार क्षेत्रातील, डहाणू तालुक्यातील किनारपट्टी, खाड्या, खारभुमी, ई. वरील जलस्तर वाढीने लगतच्या गाव-पाडे, डहाणू शहर येथिल लोकवस्त्यावर संभवित होणाऱ्या परिणामबद्दल विविध संस्थानी प्रसिद्ध केलेले अहवाल मागवून उपाय-योजना आखणी करण्याबाबत.

**संदर्भ:-** सोसायटी फॉर फास्ट जस्टिस, डहाणू रोड यांचेकडील पत्र जा.क्र.S.F.F.J/TSL/०-२-२०२२ Date-१३/१२/२०२२ व दि.२७/१२/२०२२ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयान्वये संदर्भिय अर्जानुसार आपणास कळविण्यात येते की, प्रस्तावित वाढवण बंदराबाबत NCSCM चेन्नई यांचे अहवालाची प्रत या कार्यालयास उपलब्ध नाही. त्यामुळे त्यअनुषंगाने कोणतेही टिपण, पत्रव्यवहार झालेले नाहीत त्यामुळे आपणास कोणतीही कागदपत्र पुरविता आले नाही.

आपण दि.२७/०९/२०२२ रोजीचे अर्जात डहाणू विकास आराखडयातील विकास कामाना स्तगिती देण्यात यावी अशी मागणी केलेली होती. त्यामुळे सदर बाब मुख्याधिकारी डहाणू नगर परिषद यांचे कार्यकक्षेतील असल्याने आपला सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी मुख्याधिकारी डहाणू नगर परिषद यांना पाठवून त्याची प्रत आपणांस देणेत आलेली आहे.

तसेच दि.२७/१२/२०२२ चे पत्रात देखील JNPT च्या अहवालाची प्रत मागवून पाहणी अहवालाची या कार्यालयाकडील तज्ञांकडून पाहणी करावी व संभवित धोक्याबाबत आधीच उपाय योजना आखणेबाबत कार्यवाही व्हावी. तसेच डहाणू तालुक्यातील समुद्र किनाऱ्यालगत रस्ते बांधणी व समुद्र महामार्गाचे कामांना स्थगिती देणेबाबत मागणी करीत आहात. तरी आपणास पुन्हा कळविण्यात येते की, समुद्र किनाऱ्यालगत रस्ते बांधणी व समुद्र महामार्गाचे कामांना स्थगिती देणे हि बाब या कार्यालयाचे कार्यक्षेत्रात येत नसून गट विकास अधिकारी पंचायत समिती डहाणू, मुख्याधिकारी डहाणू नगर परिषद व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेशी निगडीत आहे.सबब आपला अर्ज पुढील कार्यवाहीसाठी संबधित विभागाकडे पाठविणेत येत असून नस्तीबंद करणेत येत आहे.

सही
(अभिजीत देशमुख)
**तहसिलदार डहाणू**

प्रत:-.१.गट विकास अधिकारी पंचायत समिती डहाणू, यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
२.मुख्याधिकारी, डहाणू नगर परिषद यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
३. उप विभागीय सार्वजनिक बांधकाम विभाग डहाणू विभाग डहाणू यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

२/- अर्जदार श्री. प्रकाश विष्णु अभ्यंकर सचिव, सोसायटी फॉर फास्ट जस्टिस, डहाणू रोड, यांचे अर्जाची प्रत जोडली आहे. प्रस्तुत अर्जातील मुद्दे आपल्या कार्यालयाशी निगडीत असलेने विषयाकिंत बाबत आपलेमार्फत योग्य ती कार्यवाही करून आपले स्तरावर अवगत करावे.

प्रत मिळाली
[signature]
१८-०१-२०२३

(अभिजीत देशमुख)
**तहसिलदार डहाणू**